## लष्करप्रमुखांना एका महिन्याची मुदतवाढ

**नवी दिल्ली :** लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांना केंद्राने एक महिन्याची मुदतवाढ दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने रविवारी याला मंजुरी दिल्याची माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली. जनरल पांडे यांची सेवा ३१ मे रोजी समाप्त होणार होती. आता ते ३० जूनपर्यंत पदावर कायम राहतील. सैन्याच्या प्रमुखांना अशाप्रकारे मुदतवाढ देण्याचा निर्णय दुर्मीळ आणि असामान्य आहे. यापूर्वी इंदिरा गांधी पंतप्रधान असताना तत्कालीन लष्करप्रमुख जनरल गोपाल गुरुनाथ बेवूर यांना एका वर्षाची मुदतवाढ देण्यात आली होती.

## निवडणुकीपूर्वीच ऋषी सुनक यांना धक्का

**लंडन :** ब्रिटनमध्ये येत्या ४ जुलै रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे, परंतु ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या सत्ताधारी हुजूर पक्षासमोरील अडचणी वाढल्या आहेत. यापूर्वी पक्षाच्या ७६ सदस्यांनी निवडणुकीच्या तोंडावर राजीनामा दिला असताना, आता कॅबिनेट मंत्री मायकेल गोव्ह आणि अँड्रिया लीडसम यांनी आगामी निवडणूक लढवण्यास असमर्थता दर्शवत राजीनामा दिला आहे. त्यामुळे हुजूर पक्षाच्या राजीनामा दिलेल्या सदस्यांची संख्या ७८ वर पोहोचली आहे.

## प्रज्वल पारपत्रप्रकरणी केंद्र सरकारवर आरोप

**बंगळुरू :** लैंगिक शोषणाचे आरोप असलेल्या खासदार प्रज्वल रेवण्णा यांचे पारपत्र रद्द करण्याच्या विनंतीवर केंद्र सरकारकडून कर्नाटक सरकारला अद्याप प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप राज्याचे गृहमंत्री जी. परमेश्वरा यांनी रविवारी केला. प्रज्वल यांचे पारपत्र रद्द करण्याची राज्य सरकारची विनंती २१ मे रोजीच प्राप्त झाल्याचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी सांगितले होते. यावरून परमेश्वरा यांनी जयशंकर यांचा समाचार घेत मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना १ मे रोजी पाठवलेल्या पत्राचे काय झाले, असा सवाल केला.

## भूस्खलनात ६७० जणांचा मृत्यू

**मेलबर्न :** पापुआ न्यू गिनीमध्ये झालेल्या भूस्खलनात मृतांचा आकडा ६७० हून अधिकवर गेल्याचा अंदाज आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटनेने व्यक्त केला आहे. शुक्रवारच्या भूस्खलनामुळे येथील १५० हून अधिक घरे गाडली गेली होती. यात पूर्वीचा अंदाज ६० घरांचा होता. दक्षिण पॅसिफिक बेटातील यूएन स्थलांतर संस्थेच्या मोहिमेचे प्रमुख सेरहन अक्टोप्राक यांनी सांगितले की, मृतांचा सुधारित आकडा प्रांतीय अधिकाऱ्यांनी केलेल्या मोजणीवर आधारित आहे.

## केरळला केंद्राकडून २०० कोटी रुपये

**तिरुवअनंतपुरम :** तिरुवअनंतपुरममध्ये मान्सूनपूर्व पावसामुळे ठिकठिकाण पाणी साचले होते. त्यावर उपाययोजना करण्यासाठी केंद्र सरकारने केरळ सरकारला केंद्रीय उपक्रमाअंतर्गत २०० कोटी रुपयांचा निधी देऊ केला आहे. केंद्रीय मंत्री आणि भाजपचे तिरुवअनंतपुरममधील उमेदवार राजीव चंद्रशेखर यांनी समाजमाध्यमावरून यासंबंधी माहिती दिली.

# व्यवस्थेविरुद्ध आंदोलन ते 'कान'मध्ये पुरस्कार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेची (एफटीआयआय) माजी विद्यार्थिनी पायल कपाडियाच्या 'ऑल वी इमॅजिन अॅज लाईट' या चित्रपटाने जगप्रसिद्ध कान महोत्सवात 'ग्रां प्री' पुरस्कार पटकावला आहे. विद्यार्थिदशेत व्यवस्थेविरुद्ध आंदोलन ते प्रतिष्ठित पुरस्कारविजेती आणि प्रतिष्ठित पुरस्कार मिळाल्यावर ज्या व्यवस्थेविरुद्ध आंदोलन केले, त्यांच्याकडूनच प्रशंसा, असा पायलचा प्रवास लक्षवेधी ठरला आहे.

> २०२१ मध्ये पायलच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवरील 'अ नाइट नोइंग नथिंग' या माहितीपटाने कानमध्ये गोल्डन आय पुरस्कार मिळवला होता.



७७व्या आंतरराष्ट्रीय कान चित्रपट सोहळ्यामध्ये पायल कपाडिया यांच्या 'ऑल वी इमॅजिन अॅज लाईट' चित्रपटाला पुरस्कार मिळाला. त्यांच्याबरोबर कानी कुसृती, छाया कदम आणि दिव्या प्रभा

पायलला मिळालेला हा पुरस्कार चित्रपट क्षेत्रात जागतिक स्तरावर प्रतिष्ठेचा समजला जातो. यंदाच्या महोत्सवात या पुरस्कारासाठी चुरस होती. त्यात फ्रान्सिस फोर्ड कपोला यांच्यासारख्या मान्यवर दिग्दर्शकांचाही समावेश होता. त्यामुळे पायलला मिळालेल्या पुरस्काराचे महत्त्व मोठे आहे.

पायलला पुरस्कार मिळाल्यानंतर 'एफटीआयआय'मध्ये दहा वर्षांपूर्वी झालेल्या आंदोलनाच्या स्मृतीही आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ऑस्कर पुरस्कारप्राप्त ध्वनिआरेखक आणि संस्थेचे माजी विद्यार्थी रेसुल पुकुट्टी यांच्या 'फेसबुक'वरील पोस्टमुळे ताज्या झाल्या. केंद्र सरकारने २०१५ मध्ये अभिनेते गजेंद्र चौहान यांची 'एफटीआयआय'च्या अध्यक्षपदी केलेल्या नियुक्तीविरुद्ध पायलनेही आंदोलन केले होते. यात तिच्यावर गुन्हाही दाखल झाला होता. मात्र, आता मिळालेल्या पुरस्कारानंतर 'एफटीआयआय' ज्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अखत्यारित येते, त्यांनीच प्रसिद्धीपत्रक प्रकाशित करून पायलला पुरस्कार मिळाल्याची माहिती दिली. 'एफटीआयआय'नेही संस्थेच्या 'एक्स' खात्यावरून पायलचे अभिनंदन केले आहे.

**'एफटीआयआय'चा कानमध्ये दबदबा**

यंदाचा कान महोत्सव 'एफटीआयआय'च्या माजी विद्यार्थ्यांनी गाजवला. पायलला मिळालेल्या पुरस्कारासह चिदानंद नाईक या विद्यार्थ्याच्या लघुपटाला पहिले पारितोषिक मिळाले. पायलचा सहाध्यायी मैसम अली याचा 'इन रिट्रीट' हा चित्रपट महोत्सवात दाखवला गेला. ज्येष्ठ छायालेखक व माजी विद्यार्थी संतोष सिवन यांना चित्रपट क्षेत्रातील योगदानासाठी सन्मानित करण्यात आले.

# दिल्लीत रुग्णालयाला आग, सात अर्भकांचा मृत्यू

**पीटीआय, नवी दिल्ली**

**पूर्व दिल्लीच्या** विवेक विहार भागातील एका खासगी बालरुग्णालयाला शनिवारी रात्री भीषण आग लागून सात नवजात बालकांचा मृत्यू झाला. दिल्ली अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास 'बेबी केअर न्यू बॉर्न' रुग्णालयाला आग लागली. ही आग शेजारच्या दोन इमारतींमध्येही पसरली.

पोलिसांनी रुग्णालयाचे मालक डॉ. नवीन खिची आणि शनिवारी रात्री आग लागली तेव्हा कर्तव्यावर असलेले डॉ. आकाश यांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या रुग्णालयाच्या परवान्याची मुदत संपल्यानंतरही ते चालवले जात होते असे सांगण्यात आले. त्याशिवाय अग्निशमन दलाकडूनही ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले नव्हते अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तसेच रुग्णालयात पात्र डॉक्टरांचीही भरती केलेली नव्हती असा धक्कादायक प्रकारही उघड झाला आहे.

दिल्ली सरकारने या दुर्घटनेच्या न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले. विभागीय आयुक्त अश्विनी कुमार यांनी जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांना चौकशी करण्याचा आदेश दिला. न्यायदंडाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, आग लागली तेव्हा रुग्णालयात १२ नवजात बालकांना दाखल करण्यात आले होते. त्यापैकी एकाचा जागेवरच मृत्यू झाला. अन्य ११ बालकांना जवळच्याच दुसऱ्या रुग्णालयात नेण्यात आले तेव्हा त्यातील सहा बालके मृतावस्थेत होती. मृत बालकांमध्ये चार मुले आणि तीन मुलींचा समावेश होता. सहा बालकांचे वय १५ दिवस तर एकाचे २५ दिवस इतके होते.

या घटनेतील निष्काळजीपणास जबाबदार असलेल्यांना सोडणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिला. दिल्लीचे आरोग्यमंत्री सौरभ भारद्वाज आणि नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी स्वतंत्रपणे घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. या आगीसाठी संबंधित अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष प्रियांक कानूनगो यांनी केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मृत बालकांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा केली.



### बघ्यांच्या गर्दीमुळे बचावकार्यात अडथळे

अग्निशमन दलास आग विझवताना अनेक अडथळे आले. इमारतीबाहेर बघ्यांची गर्दी झाली होती आणि त्यापैकी अनेक जण मोबाइलवर चित्रीकरण करत होते. आग विझवण्यासाठी पाणी नव्हते. तसेच विद्युत तारा अगदी खालून गेलेल्या असल्याने आगीवर नियंत्रण मिळविणे अवघड झाल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

> रुग्णालयाच्या परवान्याची मुदत ३१ मार्च रोजीच संपली होती. तसेच जेव्हा परवाना जारी करण्यात आला होता, तेव्हाही केवळ पाच खाटांचीच परवानगी देण्यात आली होती. तपासादरम्यान आम्हाला असेही आढळले की, डॉक्टर बीएएमएस पदवीधारक असून ते नवजात बालकांवर उपचार करण्यासाठी पात्र किंवा सक्षम नव्हते.
> सुरेंद्र चौधरी, पोलीस उपायुक्त

# 'ही मानवनिर्मित आपत्ती'

### आगीबद्दल गुजरात उच्च न्यायालयाची टिप्पणी

**पीटीआय, अहमदाबाद**

**गुजरात उच्च** न्यायालयाच्या विशेष खंडपीठाने रविवारी राजकोट गेम झोन आगीची स्वतःहून दखल घेत ही प्रथमदर्शनी 'मानवनिर्मित आपत्ती' असल्याचे म्हटले आहे. शहरातील असे गेमिंग झोन आणि करमणूक सुविधा सक्षम अधिकाऱ्यांच्या आवश्यक मंजुरीविना निर्माण झाल्या आहेत, असे निरीक्षण न्यायमूर्ती बीरेन वैष्णव आणि देवन देसाई यांच्या खंडपीठाने नोंदवले.

न्यायालयाने अहमदाबाद, वडोदरा, सुरत आणि राजकोट महापालिकांच्या वकिलांना कायद्याच्या कोणत्या तरतुदींनुसार या गेमझोनची स्थापना केली किंवा त्यांच्या अधिकारक्षेत्रात सुरू ठेवले, यावर सोमवारी स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले आहेत.

राजकोट येथील गेम झोनमध्ये भीषण आगीत २७ जणांचा मृत्यू आणि तीन जखमी झाल्याची घटना शनिवारी घडली होती. आगीप्रकरणी रविवारी पहाटे राजकोट पोलिसांनी धवल कॉर्पोरेशनचे मालक धवल ठक्कर, रेसवे एंटरप्राइझचे भागीदार अशोकसिंह जडेजा आदींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



यात युवराजसिंह सोलंकी आणि नितीन जैन यांना अटक करण्यात आल्याची माहिती राजकोटचे पोलीस उपायुक्त पार्थराजसिंह गोहिल यांनी दिली. गेमझोनमध्ये योग्य अग्निशमन उपकरणे नव्हती आणि अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्रही घेतले नव्हते, त्यामुळे इमारतीत आगीमुळे भीषण घटना घडू शकते हे माहीत असूनही नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

## उत्तर प्रदेशात १२ भाविकांचा अपघातात मृत्यू

**शहाजहानपूर (उत्तर प्रदेश) :** उत्तराखंडमधील पूर्णागिरी मंदिरात दर्शनासाठी निघालेल्या सहा महिला आणि तीन मुलांसह १२ भाविकांचा बस-ट्रक अपघातात मृत्यू झाल्याची घटना शनिवारी रात्री शहाजहानपूर जिल्ह्यात घडली. या अपघातात ९ जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केल्याची माहिती देण्यात आली. पोलिसांनी ट्रकचालकाला ताब्यात घेतले आहे.


## जाहीर सूचना

आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, आम्ही अधिराज कन्स्ट्रक्शन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या ("एसीपीएल"), कंपन्या अधिनियम, १९५६ अंतर्गत एक नोंदणीकृत कंपनी, धारण केलेला सीआयएन – यू४५२००एमएच१९९९ पीटीसी११८६६५ व तिचा असलेला नोंदणीकृत पत्ता – ५०६, शारदा चेंबर्स, १५, न्यू मरिन लाईन्स, मुंबई सिटी–४०००२०, महाराष्ट्र, भारत, तिच्या संपूर्ण मालकीच्या जमिनींकरिता, एकूण मोजमापाची १,६२,३१० चौ.मी. (अदमासे), जी याखाली लिखित अनुसूचीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णिलेली आहे (**"मोठ्या जमिनी"**), नामाधिकाराचा तपास करीत आहोत.

विक्रि, हस्तांतरण, देवघेव, विक्रि करारनामा, सामंजस्य करार, संयुक्त विकास, संयुक्त उपक्रम, भाडेपट्टा, पोट–भाडेपट्टा, अभिहस्तांकन, गहाणवट, आकार, धारणाधिकार, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, भेट, योजना, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, कुळवहिवाट, पोट–कुळवहिवाट, लिव्ह अँड लायसन्स, काळजीवाहू तत्त्वावर, भोगवटा, ताबा, कुटुंब व्यवस्था / समझोता, प्रलंबित वाद, जप्ती, पुरस्कार, कोणत्याही न्यायालयाचा निर्णय, हुकूमनामा किंवा आदेश, कंत्राट, भागीदारी किंवा अन्य कोणतेही लेखन / व्यवस्थापन किंवा त्यामध्ये किंवा त्यावरील जे काही असेल त्या कोणत्याही तऱ्हेने किंवा उक्त मोठ्या जमिनी किंवा त्यावरील कोणत्याही भागासंबंधित किंवा धारण आधारे आणि / किंवा "एसीपीएल"द्वारा किंवा त्याच्या कोणत्याही पूर्वजांद्वारा त्याच्या / तिच्या / त्यांच्याकडे ठेव असलेल्या मोठ्या जमिनीसंबंधित कोणतीही नामाधिकार कागदपत्रे ताब्यात असलेली किंवा नामाधिकार किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने (मोजमापाची १,०६,९८४ चौ.मी. उक्त मोठ्या जमिनींच्या भागासंबंधित "एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या नावे निर्मिती केलेल्या जतन व गहाण असलेल्या खात्यातील वगळता) याद्वारा (**जतन व वगळता (i) मोजमापाची १,०६,९८४ चौ.मी. मोठ्या जमिनीच्या भागासंबंधित "एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"चे सुरक्षा विश्वस्त म्हणून विस्त्रा आयटीसीएल (इंडिया) लिमिटेडच्या नावे निर्मिती केलेली गहाणवट, (ii) प्रकल्पांतील युनिट्स / फ्लॅट्सचे लाभार्थी म्हणजेच :- अधिराज सम्यामा टॉवर १ए, अधिराज सम्यामा टॉवर १बी, अधिराज सम्यामा टॉवर १सी, अधिराज सम्यामा टॉवर १डी, अधिराज सम्यामा टॉवर २ए, अधिराज सम्यामा टॉवर २बी, अधिराज सम्यामा टॉवर ३बी, अधिराज कॅपिटल सिटी टॉवर मेराकी, अधिराज कॅपिटल सिटी टॉवर ओरेका, अधिराज कॅपिटल सिटी टॉवर मिझानी ज्यांचा उक्त मोठ्या जमिनींच्या भागावर विकास होत आहे (iii) मोठ्या जमिनींच्या पोर्शनवर बांधकाम केलेले / बांधकाम करावयाचे फ्लॅट्स / युनिट्सच्या स्वरूपात बिल्ट–अप एरिआ मोजमापाचा ४४,१०० चौ.मी. आणि मुंबई मेट्रोपोलिटन रिजन डेव्हलपमेंट ॲथॉरिटीच्या नावे हस्तांतरित करावयाच्या आणि (iv) रोडच्या विकासाकरिता पनवेल म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडे याआधीच सोपविलेला एकूण मोजमापाच्या ९,९००.६१ चौ.मी. मोठ्या जमिनींचा काही भाग**) उक्त मोठ्या जमिनीसंबंधित कोणताही हक्क, नामाधिकार, लाभ, हित, भाग, दावा आणि / किंवा मागणी असलेली कोणतीही व्यक्ती / व्यक्तीं / संस्था समाविष्ट कोणत्याही बँका, वित्तीय संस्थांना याद्वारा सदर दावे असलेल्या आधारे सर्व कागदपत्रांच्या प्रतींसह एकत्रीत, मेसर्स इकॉनॉमिक लॉज प्रॅक्टिस, ९वा मजला, मफतलाल सेंटर, विधान भवन मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई–४०० ०२१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीच्या आत निम्नस्वाक्षरीकारांकडे तसे लेखी कळविण्यास फर्माविण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास कोणताही कथित हक्क, नामाधिकार, लाभ, भाग, दावा, आक्षेप आणि / किंवा मागणी, जर असल्यास, सोडून दिल्याचे / परित्याग केल्याचे मानले जाईल आणि ते बांधील असणार नाहीत.

**अनुसूची**

**(वरील संदर्भित उक्त मोठ्या जमिनींचे वर्णन)**

सर्व जमिनींचे खंड व तुकडे जे येथे पडून असलेले, असलेले व स्थित असलेले–व्हिलेज–रोहिंजन, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड, नोंदणी उप–जिल्हा, पनवेलमधील आणि त्या संबंधित सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे :–

| सर्व्हे नं. | मोठी जमीन (चौ.मी.मधील) | मोठ्या जमिनींच्या सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | उत्तर | दक्षिण | पूर्व | पश्चिम |
| ६४/२ | २,०३० | सर्व्हे नं. ६४/१ | सर्व्हे नं. ९९ | सर्व्हे नं. ९९/२ व सर्व्हे नं. ६४ | सर्व्हे नं. ९९ (पार्ट) |
| ६६/२ | २,७०० | सर्व्हे नं. ६६/३ | सर्व्हे नं. ६७/२ व रोड, ६७/१ | सर्व्हे नं. ६६/५ | सर्व्हे नं. ६६/१ |
| ६७/१ | ७,७०० | सर्व्हे नं. ६६ | सर्व्हे नं. ६७/३ व सर्व्हे नं. ६७/४ | रोड | सर्व्हे नं. ९९ (पार्ट) |
| ६७/२/१ | ४,८३० | सर्व्हे नं. ६७/२/२ | सर्व्हे नं. ६८ | पाँड | सर्व्हे नं. ६७/४ |
| ६७/२/२ | ३,८०० | सर्व्हे नं. ६६ | सर्व्हे नं. ६७/२/१ | पाँड | सर्व्हे नं. ६७/१, सर्व्हे नं. ६७/४ |
| ६७/४ | २,३०० | सर्व्हे नं. ६७/१ व रोड | सर्व्हे नं. ६८/२ | सर्व्हे नं. ६७/२/१, ६७/२/२ व रोड | सर्व्हे नं. ६७/३ |
| ६८/१ए | ३,०५० | सर्व्हे नं. ६७/३ | सर्व्हे नं. ६८/१बी | सर्व्हे नं. ६८/२ | सर्व्हे नं. ९९ |
| ६८/१बी | ३,०५० | सर्व्हे नं. ६८/१ए | सर्व्हे नं. ६९ | सर्व्हे नं. ६८/२ | सर्व्हे नं. ९९ |
| ६८/२ | ४,६०० | सर्व्हे नं. ६७/३, ६७/४ व सर्व्हे नं. ६७/२/१ | सर्व्हे नं. ६९ | सर्व्हे नं. ६८/४ व सर्व्हे नं. ६८/३ | सर्व्हे नं. ६८/१ |
| ६८/४ | २,५३० | सर्व्हे नं. ६७/२/१ व रोड | सर्व्हे नं. ६८/३ | सर्व्हे नं. ६८/३ व रोड | सर्व्हे नं. ६८/२ |
| ६९ | १३,९२० | सर्व्हे नं. ६८/१, ६८/२ व ६८/३ | सर्व्हे नं. ७०/१, ७०/२, ७०/३ | सर्व्हे नं. ७३ | सर्व्हे नं. ६८/२ |
| ७०/१ | २,१७० | सर्व्हे नं. ६९ | सर्व्हे नं. ७१/१ | सर्व्हे नं. ७०/२ | सर्व्हे नं. ९१ |
| ७०/२ | ३,४८० | सर्व्हे नं. ६९ | सर्व्हे नं. ७१/१, ७१/२ व सर्व्हे नं. ७१/३ | सर्व्हे नं. ७०/३ | सर्व्हे नं. ७०/१ |
| ७१/२ | २,८०० | सर्व्हे नं. ७०/२ | सर्व्हे नं. ८९/२ | सर्व्हे नं. ७१/३, सर्व्हे नं. ७१/४ | सर्व्हे नं. ७१/१ |
| ७१/३ | २,२८० | सर्व्हे नं. ७०/२ व सर्व्हे नं. ७०/३ | सर्व्हे नं. ७१/४ | सर्व्हे नं. ७०/४ व सर्व्हे नं. ७२/१ | सर्व्हे नं. ७१/२ |
| ७१/४ | १,००० | सर्व्हे नं. ७१/३ | सर्व्हे नं. ८९/२ | सर्व्हे नं. ७२/१बी | सर्व्हे नं. ७१/२ |
| ७२/१ए | ५,२९० | सर्व्हे नं. ७२/३ | सर्व्हे नं. ७६/२/२ व सर्व्हे नं. ७६/१ | रोड, सर्व्हे नं. ७४ | सर्व्हे नं. ७२/१/बी |
| ७२/१बी | ५,१०० | सर्व्हे नं. ७०/४ व सर्व्हे नं. ७२/२ | सर्व्हे नं. ७६/१ व सर्व्हे नं. ८९/१ | सर्व्हे नं. ७२/१/ए | सर्व्हे नं. ७१/३ व सर्व्हे नं. ७१/४ |
| ७२/३ | ४,६३० | सर्व्हे नं. ७३ व रोड | सर्व्हे नं. ७२/१/ए | सर्व्हे नं. ७४ व रोड | सर्व्हे नं. ७२/२ |
| ७६/१ | ५,२९० | सर्व्हे नं. ७२/१/ए व सर्व्हे नं. ७२/१/बी | सर्व्हे नं. ७६/३ | सर्व्हे नं. ७६/२/२ | सर्व्हे नं. ८९/१ |
| ७६/२/१ | ५,१३० | सर्व्हे नं. ७६/२/२ | सर्व्हे नं. ७७/२ | सर्व्हे नं. ७५ | सर्व्हे नं. ७६/३ व ७७ |
| ७६/२/२ | ४,८०० | सर्व्हे नं. ७२/१ए व सर्व्हे नं. ७४ | सर्व्हे नं. ७६/२/१ | सर्व्हे नं. ७६/२/१ | सर्व्हे नं. ७६/१ |
| ७६/३ | ४,८६० | सर्व्हे नं. ७६/१ | सर्व्हे नं. ७७ | सर्व्हे नं. ७६/२ | सर्व्हे नं. ८९ |
| ७७/१ | ५,७२० | सर्व्हे नं. ७६/३ | सर्व्हे नं. ७७/२ | सर्व्हे नं. ७७/२ | सर्व्हे नं. ८८ व सर्व्हे नं. ८९/१ |
| ७७/२ | १७,४०० | सर्व्हे नं. ७७/१ व सर्व्हे नं. ७६/२/१ | सर्व्हे नं. ७९/३ व सर्व्हे नं. ८१ | सर्व्हे नं. ७८ | सर्व्हे नं. ७७/१ व सर्व्हे नं. ८८ |
| ७९/३ | ४,८१० | सर्व्हे नं. ७७/२ | सर्व्हे नं. ७९/१ + ४ बी व सर्व्हे नं. ७९/१+४सी | सर्व्हे नं. ७९/२ | सर्व्हे नं. ८१ |
| ८६/१ | ७,६८० | सर्व्हे नं. ८६/२ | सर्व्हे नं. ८५ | सर्व्हे नं. ८७ व सर्व्हे नं. ८८ | सर्व्हे नं. ९१/३ व सर्व्हे नं. ९२ |
| ८६/२ | ६,००० | सर्व्हे नं. ८९/१ व सर्व्हे नं. ९० | सर्व्हे नं. ८६/१ | सर्व्हे नं. ८८ | सर्व्हे नं. ९१/२ व सर्व्हे नं. ९१/३ |
| ८८/० | ७,७१० | सर्व्हे नं. ८९/१ | सर्व्हे नं. ८७ (पार्ट) | सर्व्हे नं. ७७/१ | सर्व्हे नं. ८६/१ व सर्व्हे नं. ८६/२ |
| ८९/१ | ७,१०० | सर्व्हे नं. ८९/२ व सर्व्हे नं. ७२/१/बी | सर्व्हे नं. ८८ व सर्व्हे नं. ८६ | सर्व्हे नं. ७६/१, सर्व्हे नं. ७७/१ व सर्व्हे नं. ७६/३ | सर्व्हे नं. ८६ व सर्व्हे नं. ८९/२ |
| ८९/२ | २,३३० | सर्व्हे नं. ७१/१, सर्व्हे नं. ७१/२ व सर्व्हे नं. ७१/४ | सर्व्हे नं. ८९/१ | सर्व्हे नं. ८९/१ | सर्व्हे नं. ९० |
| ९०/० | ८०० | सर्व्हे नं. ७१/१ | सर्व्हे नं. ८६ | सर्व्हे नं. ८९/२ | सर्व्हे नं. ९१ |
| ९१/३ | ४,००० | सर्व्हे नं. ९१/१ व सर्व्हे नं. ९१/२ | सर्व्हे नं. ८६/१ व सर्व्हे नं. ८६/२ | सर्व्हे नं. ८६/१ व सर्व्हे नं. ८६/२ | सर्व्हे नं. ९२ |
| ९९/२ | १,४२० | सर्व्हे नं. ६४ | सर्व्हे नं. ६७/१ व सर्व्हे नं. ९९ | सर्व्हे नं. ६७/१ | सर्व्हे नं. ६४/२ |
| एकूण | १,६२,३१० | | | | |

आज दिनांकित २७ मे, २०२४

मेसर्स इकॉनॉमिक लॉज प्रॅक्टिस
(ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स)
स्वाक्षरी/–
हिना छेडा
भागीदार
ईमेल : heenachheda@elp-in.com


# अमेरिकेत वादळामुळे ११ ठार

**एपी, व्हॅली व्ह्यू (टेक्सास)**

**टेक्सास, ओक्लाहोमा** आणि आर्कान्सासमध्ये तीव्र वादळांमुळे ११ नागरिकांचा मृत्यू झाला. या वादळात अनेक घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ओक्लाहोमा सीमेजवळ टेक्सासमधील कुक काऊंटीमध्ये सात जणांच्या मृत्यूची नोंद झाली. शनिवारी रात्री येथे एका मोबाइल होम पार्कजवळ चक्रीवादळ धडकले. ओक्लाहोमामध्येही वादळामुळे मोठे नुकसान झाले आहे. या संपूर्ण भागात वीजपुरवठा खंडित झाला होता. आर्कान्सासमध्ये किमान दोन नागरिकांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. दरम्यान, सोमवारी उत्तर कॅरोलिना आणि व्हर्जिनियामध्ये तीव्र वादळाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# पश्चिम बंगाल, बांगलादेश किनारपट्टीवर रेमल चक्रीवादळ दाखल

**पीटीआय, कोलकाता**

**पश्चिम बंगाल** आणि बांगलादेश किनारपट्टी भागात रेमल चक्रीवादळ रविवारी रात्री दाखल झाले. या वादळाची तीव्रता ताशी ११० ते १२० किलोमीटर इतकी होती, अशी माहिती हवामान विभागाने दिली. रात्री साडेआठला बंगालच्या किनारपट्टीपासून सुमारे ३० किमी अंतरावर दाखल झालेल्या 'रेमल'चा प्रभाव सुमारे चार तास सुरू राहील, असे हवामान खात्याने म्हटले आहे.

पश्चिम बंगाल आणि बांगलादेश किनाऱ्यावर तसेच उत्तर बंगालच्या उपसागरात वादळी वाऱ्याचा वेग ताशी ११० ते १२० किमी होता. त्यानंतर हे वारे ताशी १३५ किमी वेगाने वाहत होते. सहा तासानंतर त्याची तीव्रता कमी होणार असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी बैठक घेऊन पूर्वतयारीचा आढावा घेतला. तसेच केंद्रीय गृह विभागाला परिस्थितीवर देखरेख ठेवायला सांगितले.



### एक लाखाहून अधिक नागरिकांचे स्थलांतर

पश्मिच बंगाल सरकारने किनारपट्टी भागाप्रमाणेच सागर बेट आणि सुंदरबन येथून एक लाखाहून अधिक नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर केले. राज्य आपत्ती व्यवस्थापन आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) यांच्या प्रत्येकी १६ तुकड्या किनारी भागात तैनात करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याशिवाय ५.४० लाख ताडपत्रींचे वाटप केले आहे, तसेच रेशन, पावडर दूध आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही केली आहे.


Reliance
Industrial Infrastructure
Limited

नोंदणीकृत कार्यालय: एनकेएम इंटरनॅशनल हाऊस, ५वा मजला, १७८ बॅकबे रिक्लमेशन, एलआईसी योगक्षेमा बिल्डिंगच्या मागे, बाबुभाई चिनाय मार्ग, मुंबई – ४०० ०२०
दूरध्वनी: +९१–२२–७९६७ ९०५३ • ईमेल: investor_relations@riil.in
CIN: L60300MH1988PLC049019

**सूचना**

**(कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)**

**विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणात हस्तांतरण**

गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६, सुधारणा केलेल्या (''नियम'') मधील तरतुदींनुसार ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

इतर मुद्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशांचे सलग सात किंवा अधिक वर्ष वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्याचा दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (''आयईपीएफ'') प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.

नियमांतील विविध आवश्यकतांचे पालन करताना कंपनीने आर्थिक वर्ष २०१५–१६ किंवा तत्पूर्वीच्या ओळीने सात किंवा अधिक वर्षांच्या कालावधीसाठी लाभांशाचे पैसे न देण्यात आलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व समभागांचे त्यांच्या संबंधित देय तारखांना आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरण केले आहे. कंपनीने, आर्थिक वर्ष २०२४–२५ मध्ये आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित, योग्य कार्यवाही करण्यासाठी, दिनांक २५ मे, २०२४ च्या पत्राद्वारे व्यक्तिगतरित्या संबंधित भागधारकांना कळविले आहे.

कंपनीने आपल्या वेबसाईटवर **www.riil.in** आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला आहे. भागधारकांना **https://www.riil.in/transfer_suspense_accountiepf.html** ही वेब–लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करून, भागधारकांनी दावा न केलेला लाभांश व समभाग, दोन्ही जे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत, सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.

प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्याकडे असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्राऐवजी कंपनी नियमानुसार डिमटिरिअलाईज करण्यासाठी आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी सदर समभाग प्रमाणपत्रांची नविन प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला भागधारकांचा तपशिल हा ह्या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या नविन प्रतींसाठीची योग्य सूचना आहे.

**कंपनीला संबंधित भागधारकांकडून ३ सप्टेंबर, २०२४ रोजी किंवा तत्पुर्वी कोणतेही उत्तर (दावा न केलेल्या/वसूल न केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासंदर्भात) न मिळाल्यास, नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या पद्धतींनुसार कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारे कंपनी नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी समभाग डिमटिरिअलाईजकरून ते आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करेल.**

भागधारकांना या संदर्भात आणि नियमांविषयी काही शंका असल्यास, त्यांनी श्री. व्ही. बालाक्रिष्णन, उपाध्यक्ष, **केफिन टेक्नॉलॉजीस् लिमिटेड,** कंपनीचे समभाग हस्तांतरण एजंट्स यांच्याशी पत्ता: सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१–३२, गचीबोवली, फायनानशियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैदराबाद – ५०० ०३२, टोल फ्री क्र: १८००–३०९–४००१ (सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ९:०० (भाप्रवेळ) ते सायंकाळी ६:०० (भाप्रवेळ), ई–मेल: riilnkm@kfintech.com, वेबसाईट: www.kfintech.com येथे संपर्क साधावा.

**रिलायन्स इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड** करिता
सही/–
अमितकुमार मुंढे
कंपनी सचिव आणि कंप्लायंस ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : २७ मे, २०२४

www.riil.in


# इस्त्रायलवर हमासचा रॉकेट हल्ला

**एपी, देर अल-बलाह (गाझा पट्टी)**

**इस्त्रायलच्या तेल** अविव या शहरावर हमासने रविवारी रॉकेट हल्ला केला. या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाली किंवा नाही याबद्दल तातडीने माहिती मिळालेली नाही. इस्त्रायल आणि हमासदरम्यान सुरू असलेल्या युद्धात इस्त्रायलने गाझावर गेल्या सहा महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हवाई, सागरी आणि जमिनीवरून हल्ले केले आहेत. त्या तुलनेत हमासने अनेक महिन्यांमध्ये पहिल्यांदाच इस्त्रायलवर लांब पल्ल्याच्या रॉकेटने हल्ला केला आहे.

हमासच्या लष्काराने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. मध्य गाझामधून रॉकेटने हल्ले केले जात असल्याचे आवाज ऐकू येत होते. इस्त्रायलच्या लष्कराने सांगितले की, रविवारी दिवसभरात दक्षिण गाझामधील राफामधून आठ रॉकेट सोडण्यात आले. इस्त्रायलच्या लष्कराने अलीकडेच राफामध्ये कारवाईला सुरुवात केली आहे.

दुसरीकडे, मदतसामग्री घेऊन येणाऱ्या ट्रकने रविवारी इजिप्तमधून गाझामध्ये प्रवेश केला. मदत सामग्री आणणाऱ्या वाहनांना राफामध्ये प्रवेश करावा लागू नये यासाठी समझोता करण्यात आला आहे.



हमासच्या रॉकेट हल्ल्यात इस्त्रायलमधील काही घरांचे नुकसान झाले.